महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय**

नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११ ००१

दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६०५०००९, ई-मेल- dlrmah-survey@mah.gov.in

क्रमांक भू-४/ई. २१२६०९०/२०२५ दिनांक : ०४/०९/२०२५

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव (महसूल),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय : ग्रामीण भागातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग / गाडीमार्ग या रस्त्यांचे सिमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देणेबाबत कार्यपध्दती बाबत.

संदर्भ : १. महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक : लवेसु-२०२५/प्र. क्र. ४५८/भूमापन (ल-१), दि. २९ ऑगस्ट २०२५.
२. मा. सहसचिव, म-५, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. मराअ-२०२५/प्र क्र. ६३/ समन्वय- ०१(म-५), दि. २१/०८/२०२५.

विषयांकित बाबत पारीत करण्यात आलेला संदर्भीय शासन निर्णय व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांचे जन्मदिनांक १७ सप्टेंबर, २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमध्ये महसूल पंधरवडा साजरा करणेबाबत चे अनुषंगाने राज्यात एकसमान कार्यवाही करणेकामी मानक कार्यपध्दती (Standard Operating Procedure) प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर मानक कार्यपध्दतीचा अवलंब करुन ग्रामस्तरावर रस्त्यांची यादी तयार करणे, अतिक्रमित रस्त्यांबाबत प्रस्ताव तयार करणे, भूमि अभिलेख विभागामार्फत सिमांकन करणे, अतिक्रमण निष्कासित करणे, रस्त्यांच्या एकत्रित नोंदी ठेवणे व रस्त्यांसाठी विशिष्ट क्रमांक निश्चित करणे इत्यादी कामे राज्यात एकसमान पध्दतीने होणार आहेत. सदर मानक कार्यपध्दती नुसार कार्यवाही करणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना आपले स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत, ही विनंती.

सोबत **मानक कार्यपध्दती** व **महसूल पंधरवडा पहिले ५ दिवस – शिव पाणंद रस्ते कार्यक्रम रुपरेषा** संलग्न करण्यात आलेली आहे.

५/९/२५

डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से.)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :** ग्रामिण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतीवर जाण्याचे पायमार्ग / गाडीमार्ग रस्त्यांचे सिमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देणेबाबत.

# मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure )

---

## टप्पा १– ग्रामस्तरावर रस्त्यांची यादी तयार करणे

**जबाबदार अधिकारी:**

- ग्रामसेवक / ग्राम महसूल अधिकारी (तलाठी)
- महसूल सेवक (कोतवाल)
- पोलीस पाटील
- भूकरमापक भूमि अभिलेख

**प्रक्रिया :**

1. शिवार फेरी करून गावातील नकाशावर उपलब्ध असलेले ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग तसेच नकाशावर नसलेले शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीमार्ग, शिवरस्ते, पाणंद रस्ते यांची यादी तयार करणे.
2. ग्रामसभेत स्थानिक नागरिकांसह चर्चा करणे.
3. यादीत खालील तपशील नोंदवणे:
   - **प्रपत्र–१:** गाव नकाशावर नोंद असलेले, वापरातील व अतिक्रमित रस्ते बाबत नोंदी घेणे {ग्रामीण गाडीमार्ग (B====) आणि पायमार्ग (C----) हे ज्या गट नंबर / सर्व्हे नंबर मधुन जातात याबाबतच्या नोंदी ७/१२ अधिकार अभिलेखात इतर हक्कात घेणे.}
   - **प्रपत्र–२:** वापरात असलेले परंतु गाव नकाशावर नसलेले रस्ते बाबत नोंदी घेणे.

---

## टप्पा २ : प्रपत्र-१ व प्रपत्र-२ मधील नोंदीनुसार अतिक्रमित रस्त्यांबाबत प्रस्ताव तयार करणे

**जबाबदार अधिकारी:**

- मंडळ अधिकारी
- ग्राम महसूल अधिकारी
- भूकरमापक भूमि अभिलेख

**प्रक्रिया:**

1. रस्तावार प्रस्ताव तयार करणे.
2. प्रस्तावात समाविष्ट तपशील:
   - लगतच्या शेतकऱ्यांची संपूर्ण नावे
   - ७/१२ उतारे
   - फेरफार नोंदी

## टप्पा  ३ – ग्रामसभेत प्राथमिक यादी ठेवणे

**जबाबदार अधिकारी:**

- महसूल व ग्रामविकास विभाग

**प्रक्रिया:**

1. प्राथमिक यादी ग्रामसभेत चर्चेसाठी ठेवणे.
2. ग्रामसभेच्या ठरावानुसार अंतिम यादी तहसीलदारांकडे सादर करणे.

---

## टप्पा  ४ – भूमिअभिलेख विभागामार्फत सीमांकन

**जबाबदार अधिकारी:**

- उप अधीक्षक भूमि अभिलेख (Deputy Superintendent, Land Records)

**प्रक्रिया:**

1. तहसीलदारांकडून अंतिम यादी मिळाल्यानंतर सीमांकन करणे.
2. नकाशावरील मूळ जागा + वर्तमान जागा यांचा विचार करणे.
3. Scanning / Digitization, Geo-referencing केलेल्या नकाशांचा वापर करून:
    - रस्त्यांची लांबी-रुंदी, अक्षांश-रेखांश निश्चित करणे ( प्रत्येक गटात रस्ता प्रवेश व शेवट ठिकाणचे अक्षांश – रेखांश जतन करणे.)
    - शेतरस्त्यांच्या हद्दींचे सिमांकन करणे.
4. मोजणी शुल्क आकारले जाणार नाही.

---

## टप्पा  ५ – अतिक्रमित रस्त्यांवरील कायदेशीर कारवाई

**जबाबदार अधिकारी :** तहसीलदार

**प्रक्रिया:**

1. ग्रामसभेच्या यादीचा आधार घेऊन नकाशा, सीमांकन अहवाल, ७/१२, फेरफार नोंदी, ग्रामसभा ठराव यांची पडताळणी.
2. अतिक्रमण निष्कासित करणेसाठी **Mamlatdar Courts Act, 1906 कलम 5** अन्वये नोटीस बजावणी.
3. सुनावणी मंडळ अधिकारी कार्यालयात आयोजित करणे.
4. पंच साक्षीदारांचे जबाब घेणे व आदेश निर्गमित करणे.
5. अतिक्रमण निष्कासित झालेनंतर:
    - भूमिअभिलेख नकाशावर रस्ता दाखवणे.

    (त्याकामी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी गावनिहाय दुय्यम पुनर्विलोकन नकाशा संधारीत करावा. **नकाशात असलेले रस्ते हिरव्या रंगाने व नकाशात नसलेले रस्ते लाल रंगाने दर्शवावे**.) सोबत नमुना जोडला आहे.
6. आवश्यक असल्यास पोलिसांची मदत घेणे. (गृह विभागाचा आदेश दि. 05.05.2025 नुसार).

---

## टप्पा ६ – रस्त्यांच्या एकत्रित नोंदी

**जबाबदार अधिकारी : तलाठी / मंडळ अधिकारी / तहसिलदार**

**प्रक्रिया:**

1. प्रत्येक गावात विविध रस्त्यांची नोंद **गाव नमुना क्रमांक** १(फ) मध्ये ठेवणे.
2. तपशील समाविष्ट करणे:
   - रस्त्यांची लांबी-रुंदी
   - कोणत्या सर्व्हे नं./गट नं. हद्दीतून रस्ता जातो
3. नोंदी गाव दप्तरात अद्ययावत ठेवणे.
4. प्रपत्र–३ (गाव नमुना १(फ)) वापरणे.

---

## टप्पा ७ – रस्त्यांसाठी विशिष्ट क्रमांक निश्चित करणे

**जबाबदार अधिकारी : तहसिलदार**

- सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामीण विकास विभाग यांचे जे रस्ते गावातुन जात आहेत त्याबाबत तेच संकेतांक कायम ठेवावेत.

**सांकेतांक कार्यपद्धती :**

1. जिल्हा सांकेतांक, दोन अंकी (प्रपत्र-४ प्रमाणे)
2. तालुका सांकेतांक, दोन अंकी
3. गाव सांकेतांक, तीन अंकी
4. रस्त्याचा प्रकार : एक अंकी इंग्रजी वर्णाक्षर (नकाशावरील रेषेनुसार)

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. रा.) पुणे यांच्या मान्यतेने जिल्हा निहाय तालुका व गाव सांकेतांक यादी संलग्न केली आहे.

---


उदाहरणार्थ : जिल्हा - जळगाव, तालुका – चाळीसगाव, गाव – अंधारी

मधील पाचवा रस्ता व सदर रस्ता शिवरस्ता/पानंद रस्ता असेल तर

सांकेतांक ०३-०५-००५-००५-E

| जिल्हा | तालुका | गाव | रस्ता | रस्त्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| ०३ | ०५ | ००५ | ००५ | E |

# नमुना - पुनर्विलोकन गाव नकाशा मौजे __, तालुका - __, जिल्हा - __



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान मा. श्री नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिन दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक २ ऑक्टांबर २०२५ या कालावधीमध्ये महसूल पंधरवडा साजरा करणेबाबत.

* **<u>पहिले ५ दिवस - शिव/पाणंद रस्ते कार्यक्रम रुपरेषा</u>**

| अ.न. | दिनांक | कार्यवाहीचा तपशील | सहभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १७/९/२०२५ | • तालुक्यातील मंडळ निहाय एक एक गावाची निवड करुन पाणंद रस्ते कार्यक्रम प्रसिध्दी<br>• गाव शिवार फेरी<br>• गावातील रस्त्यांची यादी तयार करणे (प्रपत्र-१, २) | ग्रामपंचायत व ग्रामस्थ, ग्रामसेवक, ग्राममहसूल अधिकारी, महसूल सेवक,पोलिस पाटील इ. | |
| २ | १८/९/२०२५ | • ग्रामसभा घेवून यादी अंतिम करणे<br>• ग्रामठरावासह यादी तहसिलदार यांना सादर करणे<br>• अतिक्रमण रस्त्याबाबत प्रस्ताव सादर करणे | ग्रामपंचायत व ग्रामस्थ, ग्रामसेवक, ग्राममहसूल अधिकारी, महसूल सेवक,पोलिस पाटील इ. | |
| ३ | १९/९/२०२५ | • भूमि अभिलेख विभागाकडून गाव नकाशातील रस्त्यांबाबत आवश्यक ठिकाणी सिमांकन करणे.<br>• तहसिलदार यांनी रस्तेवरील अतिक्रमणाबाबत सुनावणी घेवून आदेश पारीत करणे. | ग्रामपंचायत व ग्रामस्थ, ग्रामसेवक, ग्राममहसूल अधिकारी, भूमि अभिलेख प्रतिनिधी, महसूल सेवक,पोलिस पाटील इ. | |
| ४ | २०/९/२०२५ | • अतिक्रमण निष्कासित करणे.<br>• रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे. | ग्रामपंचायत व ग्रामस्थ, ग्रामसेवक, ग्राममहसूल अधिकारी, भूमि अभिलेख प्रतिनिधी, महसूल सेवक,पोलिस पाटील इ. | |
| ५ | २१/९/२०२५ | • भूमि अभिलेख विभागाकडून दुय्यम पुनर्विलोकन नकाशात नोंदी घेणे<br>• ग्राममहसूल अधिकारी यांनी प्रपत्र-३, गाव नमुना १ (फ) (गावातील रस्त्यांची नोंदवही) अदयावत करणे. | ग्रामसेवक, ग्राममहसूल अधिकारी, भूमि अभिलेख प्रतिनिधी, महसूल सेवक,पोलिस पाटील इ. | |